# 'मेट्रो'चे आराखडे बनवण्याची संधी

## स्थानकउभारणीत एमएमआरसीएल विद्यार्थ्यांची घेणार मदत



सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २३ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम सध्या मुंबईत वेगात सुरू आहे. या मार्गावर उभारण्यात येणाऱ्या रेल्वेस्थानकांचा आराखडा तयार करण्याची संधी विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. उत्तम आराखड्यांसाठी बक्षीसही दिले जाणार आहे. उत्तम आराखड्यांची निवड करून, स्थानकांच्या उभारणीत संबंधित विद्यार्थ्यांची मदतही घेण्यात येईल, असे 'एमएमआरसीएल'कडून सांगण्यात आले आहे.

रेल्वेमार्गाचा आराखडा कसा असावा याविषयीची संकल्पना कल्पकतेने विद्यार्थ्यांनी मांडायची आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आराखड्यांमधून उत्तम आराखड्यांची निवड करण्यात येणार आहे. या स्थानकांच्या उभारणीत संबंधित विद्यार्थ्यांची मदतही घेण्यात येणार आहे. त्याशिवाय उत्तम कल्पना आराखड्यात उतरवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसही दिले जाणार आहे, अशी माहिती 'एमएमआरसीएल'कडून देण्यात आली.

मुंबई मेट्रो-३ ही संपूर्णपणे भूमिगत असलेली देशातील पहिली मेट्रो आहे. या मार्गावर २५ स्थानके बांधली जाणार आहेत. स्थानकांचा आराखडा कसा असावा यावर सध्या 'एमएमआरसीएल'चे काम सुरू आहे. अभियांत्रिकी, वास्तुविशारद, शहर नियोजन, वाहतूक नियोजन अशा महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत सामावून घेण्यात येणार आहे.

### तीन संघांची निवड

**इच्छुक विद्यार्थ्यांनी मुंबई मेट्रो-३ च्या संकेतस्थळावर आराखडा मेल करायचा आहे. 'एमएमआरसीएल'तर्फे स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थांना आवश्यक नकाशा आणि माहिती पुरवली जाणार आहे. या मार्गिकेवरील प्रस्तावित स्थानकांपैकी कोणत्याही एका स्थानकाचा आराखडा सहभागी विद्यार्थ्यांनी बनवायचा आहे. त्यासाठी त्यांना प्रस्तावित स्थानकाच्या कामाच्या ठिकाणी येण्याची मुभा आहे. प्रत्येक स्थानकासाठी आलेल्या आराखड्यांतून तीन संघांची निवड करण्यात येईल. त्यांना पारितोषिकेही देण्यात येतील, असे 'एमएमआरसीएल'ने स्पष्ट केले आहे.**